| | |
|---|---|
| दाखल तारीख | ०९/०८/२०२३ |
| नोंदणी तारीख | ०९/०८/२०२३ |
| निकाल तारीख | ०६/०३/२०२६ |
| कालावधी | **वर्ष** २ **म.** ६ **दि.** २७ |

# नियंत्रण प्राधिकारी, उपदान प्रदान अधिनियम, १९७२
# कामगार न्यायालय, अमरावती

(पीठासिन अधिकारी – श्री. नरेंद्र श्री. निसळ)

**अर्ज उपदान क्र.१००८/२०२३**

**CNR No. MHLC270011212023**

नि.क्र.ओ – ३

आशा महादेवराव कुऱ्हाडे
वय – ७७ वर्ष , कामधंदा – सेवा निवृत्त,
राहणार – शिरजगाव कसबा, ता. चांदूर बाजार,
जिल्हा– अमरावती ... **अर्जदार**

**विरूध्द**

१. जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, अमरावती

१. मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, अमरावती ... **गैरअर्जदार**

**विधीज्ञ** : श्री. ए.के.कंटाळे, विधीज्ञ, अर्जदारातर्फे
विधी अधिकारी (श्रीमती पी.वाय.कढरे) गैरअर्जदारातर्फे

# न्यायनिर्णय

(दिनांक ०६/०३/२०२६)

अर्जदाराने सदरचा अर्ज उपदान प्रदान कायदा, १९७२ कलमचे ७(४–ब) अन्वये उपदानाची रक्कम मिळण्याकरीता केला आहे.

अर्जदाराचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे –

२. अर्जदार गैरअर्जदार यांचेकडे दिनांक १२/०९/१९६९ पासुन सातत्याने नोकरीला होते. अर्जदार दिनांक ३१/१२/२००५ रोजी आरोग्य सेविका म्हणुन सेवानिवृत्त झाले. त्यांचा शेवटच्या महिन्यातील पगार रक्कम रू.१४,८५८/– होता. त्यांनी एकूण ३६ वर्षे सेवा केली. त्यानुसार ते रक्कम रूपये २,९५,९२०/– इतकी रक्कम उपदान म्हणुन मिळण्यास पात्र आहेत. परंतु गैरअर्जदाराने त्यांना केवळ रू.१,९४,२८८/– इतकी उपदानाची रक्कम अदा केली. उर्वरित उपदानाची रक्कम रू.१,०१,६३२/– ती मिळण्यास पात्र आहे. सदरची रक्कम मागणीकरून देखील गैरअर्जदाराने ती अदा केली नाही. म्हणून सदरचा अर्ज केला आहे.

३. न्यायालयाची नोटीस मिळाल्यानंतर गैरअर्जदार न्यायालयात हजर झाले. परंतु, गैरअर्जदार यांनी प्रकरणात लेखी कैफियत सादर केलीली नाही. प्रकरणात नि.क्र.१ वर 'नो डब्ल्यू एस' आदेश पारीत करण्यात आले.

४. अर्जदार यांनी त्यांचे अर्जात नमुद केलेल्या कथनांच्या अनुषंगाने खालील मुद्दे काढण्यात येत आहे. त्यानुसार काढण्यात आलेल्या सर्व मुद्दांवरील माझे निर्णय मी कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे देत आहे.

| अनुक्रमांक | मुद्दे | निर्णण |
|---|---|---|
| १ | गैरअर्जदाराने अर्जदाराची उपदानाच्या रकमेची मोजणी योग्यरित्या केली नसल्याचे व त्यांना पुरेशी उपदानाची रक्कम अदा केली नसल्याची बाब अर्जदार सिध्द करतात काय? | होय |
| २ | अर्जदार मागणी केल्याप्रमाणे उपदानाची रक्कम मिळण्यस पात्र आहेत काय? | होय |
| ३ | आदेश काय? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

५. अर्जदार यांनी नि.क्र.यु–६ अन्वये पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. अर्जदाराने त्यांचे हकीकतीचे समनार्थ खालील कागदोपत्री पुराव्यांचा आधार घेतला आहे.

| | |
|---|---|
| १ | अर्जदाराचे आधार कार्ड नि.क्र.यु–७ |
| २ | नियुक्ती आदेश नि.क्र.यु–८ |
| ३ | निवृत्ती व उपदान आदेश नि.क्र.यु–९ |
| ४ | अंतिम वेतन प्रमाणपत्र नि.क्र.यु–१० |
| ५ | फार्म–आय नि.क्र.यु–११ |
| ६ | पोस्टाची पावती नि.क्र.यु–१२ |
| ७ | पोस्टाची पावती क्र.२ नि.क्र.यु–१३ |
| ८ | पोस्टाची रिपोर्ट नि.क्र.–१४ |
| ९ | पोस्टाची रिपोर्ट नि.क्र.–१५ |

**मुद्दा क्र.१ व २** –:

६. जिल्हा परिषद कर्मचारी यांना उपदान अदा करणेकरीता महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ च्या तरतुदी लागु आहे. परंतु जिल्हा परिषद यांनी उपदान प्रदान अधिनियम, १९७२ चे कलम ५ अन्वये सुट असल्याबाबत कोणताही पुरावा दाखल केलेला नाही. गैरअर्जदार जिल्हा परिषद ही स्थानिक स्वराज्य संस्था आहे. अर्जदार त्यांचेकडे आरोग्य सेविका म्हणुन नोकरी करीत होते. अर्जदार शासकीय कर्मचारी असल्याबाबत कोणताही पुरावा दाखल केला नाही.

७. अर्जदार यांनी त्यांच्या पुराव्या दरम्यान असे कथित केले आहे की, ते गैरअर्जदार यांच्याकडे दिनांक १२/०९/१९६९ पासुन होते. अर्जदार दिनांक ३१/१२/२००५ रोजी आरोग्य सेविका म्हणुन नोकरीतुन सेवानिवृत्त झाल्या. त्यांचा शेवटच्या महिन्यातील पगार रक्कम रूपये १४,८५८/– होता. त्यांनी एकूण ३६ वर्षे सेवा केली. त्यानुसार ते रक्कम रूपये २,९५,९२०/– इतकी रक्कम उपदान म्हणुन मिळण्यास पात्र आहेत. परंतु गैरअर्जदाराने त्यांना केवळ रू.१,९४,२८८/– इतकी उपदानाची रक्कम अदा केली. उर्वरित उपदानाची रक्कम रू.१,०१,६३२/– ती मिळण्यास पात्र आहे. सदरची रक्कम मागणीकरून देखील गैरअर्जदाराने ती अदा केली नाही.

८. अर्जदार गैरअर्जदार संस्थेत दिनांक १२/०९/१९६९ पासुन ते दिनांक ३१/१२/२००५ पर्यंत नोकरी करीत होते असे कथन केले आहे. त्याकरीता अर्जदाराने सेवा कालावधी सिध्द करण्याकरीता नियुक्ती आदेश व अंतिम वेतन प्रमाणपत्र दाखल केले आहे (नि.क्र.यु–८,१०) दाखल केलेले

आहे. त्यानुसार अर्जदाराने गैरअर्जदार संस्थेत ३६ वर्ष एकूण सेवा केल्याचे दिसून येते. नि.क्र.यु–१० वरील अर्जदाराचे वेतन प्रमाणपत्राचे अवलोकन केले असता, अर्जदाराचे शेवटच्या महिन्यातील मुळ वेतन रूपये ७,८५०/–, डी.पी स्थानापन्न वेतन रक्कम रू.३९२५ व महागाई भत्ता रुपये २,४७३/– असे एकुण वेतन रक्कम रुपये १४,२४८/– असल्याचे दिसून येते. एकूण ३६ वर्ष सेवाकालावधीकरीता उपदान म्हणून रक्कम रू.२,९५,९२०/– मिळण्यास पात्र असल्याचे दिसून येते. परंतु गैरअर्जदार यांनी केवळ रक्कम रुपये १,९४,२८८/– अदा केले आहे. अर्जदाराचा एकंदरीत पुरावा लक्षात घेता अर्जदार उर्वरित उपदानाची रक्कम रुपये १,०१,६३२/– गैरअर्जदाराकडून मिळण्यात पात्र असल्याचे दिसून येते.

९. अर्जदाराने प्रस्तुत अर्ज उपदान रकमेवर व्याजाची मागणी केली आहे. उपदान प्रदान कायदा १९७२ चे कलम ७(३–अ) नुसार देय असलेली उपदानाची रक्कम अदा न केल्यास केंद्र शासनाने अधिसुचित केलेल्या व्याजदरा अन्वये सरळ व्याज मंजुर करणे आवश्यक आहे. केंद्र शासनाने दिनांक ०१ ऑक्टोंबर १९८७ रोजी कलम ७(३–अ) अन्वये प्रसिध्द केलेल्या अधिसुचनेनुसार सरळ व्याजाचा दर १० टक्के ठरविण्यात आला आहे. त्यानुसार प्रस्तुत प्रकरणात अर्जदाराला सेवानिवृत्तीच्या तारखेपासून रक्कम अदा करेपर्यंत १० टक्के सरळ व्याज मंजुर करणे योग्य होईल. म्हणुन वरील सर्व बाबी व कारणमिमांसेच्या अनुषंगाने मुद्दा क्र.१ व २ चे उत्तर होकारार्थी देवून मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१ अर्ज अंशत: मंजुर करण्यात आला.

२ गैरअर्जदाराने अर्जदाराला उपदानाची रक्कम म्हणुन रूपये १,०१,६३२/- (अक्षरी एक लाख एक हजार सहाशे बत्तीस फक्त) दि.३१/१२/२००५ पासून रक्कम अदा करेपर्यंत १० टक्के सरळ व्याजाने अदा करावे.

३ गैरअर्जदाराने वर नमुद उपदानाची रक्कम एक महिन्याच्या आत अदा करावी. त्यानुसार गैरअर्जदार यांना नमुना आर ची नोटीस काढण्यात यावी.

न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.

NARENDRA SHRIKRISHNA NISAL

Digitally signed by NARENDRA SHRIKRISHNA NISAL
Date: 2026.03.06 17:56:56 +0530

(नरेंद्र श्री. निसळ)
न्यायाधीश,
कामगार न्यायालय, अमरावती

अमरावती
दिनांक ०६/०३/२०२६

| | | |
|---|---|---|
| युक्तीवाद दिनांक | : | ०६/०३/२०२६ |
| न्यायनिर्णय थेट संगणकावर टाईप दिनांक | : | ०६/०३/२०२६ |
| न्यायनिर्णय तपासणी व सही दिनांक | : | ०६/०३/२०२६ |